धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा

बहुजनरत्न
# लोकनायक
ठाणे | गुरुवार २ ऑक्टोबर २०२५ | वर्षे २० | अंक ३३८ | मुल्य ३ रुपये | पाने ८ | RNI No - MAHMAR/2006/17652



भारतीय महाक्रांती सेना , आंतरराष्ट्रीय मानवधिकार राजदूत संघटना,लायन्स क्लब, अनुर्वी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या संस्थांची दखल घेऊन यावर्षीचा २०२५ "उत्कृष्ट सेवाभावी संस्था" म्हणून अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान संस्थेची निवड करण्यात आली. हा भव्य समारंभ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह पुणे येथे आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष माननीय श्रीपालजी सबनीस साहेब यांची उपस्थिती लाभली , अध्यक्ष डॉ. अविनाश सकुंडे साहेब ह्याचा शुभहस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.यावेळी संघटनेचे अनेक पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष श्री अमोल वंजारे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले .